# येशूने सांगितल्यानुसार पेत्र व इतरांनी लोकांना शिष्य केले

मुलांना शिकवणाऱ्यांनी D3b हा अभ्यास वाचावा

**प्रार्थना:** हे अमाच्या स्वर्गातील पित्या आमच्या प्रिय प्रभू व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताचे खरे शिष्य होण्यास मला व मी पुढारीपण करीत असलेल्यांना साहाय्य कर आम्ही त्याच्या आज्ञा पाळाव्यात यासाठी आमचे साहाय्य कर तसेच मनुष्यनिर्मित सर्व नियम बाजूला ठेवून त्याच्या आज्ञांचे पालन करण्या इतपत त्याच्यावर प्रेम करणारे शिष्य तयार करण्यासही साहाय्य कर. येशूच्या नावात मागितले म्हणून ऐक, आमेन."


## 1. पेत्र व इतर प्रेषितांनी नवीन विश्वासणाऱ्या निर्भय शिष्य कसे केले ते शोधा

- पेटेकॉस्टच्या दिवशी यरूशलेम शहरात संपूर्ण रोमन साम्राज्यातून जमा झालेल्या यहूदी लोकांनी पेत्राचे भाषण ऐकले. यातील पुष्कळजण विरोधक होते पण पेत्राने त्यांना सांगितले "अहो इस्राएल लोकांनो नासोरी येशूच्याद्वारे देवाने जी अद्‌भुते दाखविली त्यावरून देवाने तुम्हांकरिता पटविलेला असा तो मनुष्य होता तुम्ही त्याला धरून अधर्म्यांच्या हातांनी वधस्तंभावर खिळून मारले पण देवाने त्याला मरणातून उठविले ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे" प्रे. कृ. 2:22–36.3,000



- त्यां दिवशी यहूदी लोकांनी पश्चात्ताप करून बाप्तिस्मा घेतला आणि आरंभीच्या ख्रिस्ती मंडळीत त्यांची भर पडली, प्रे. कृ. 2:38–41
- आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रे. कृ. 2 हा अध्याय संपण्यापूर्वीच ह्या हजारो नवीन विश्वासणाऱ्यांनी येशूच्या सर्व आज्ञांचे पालन करण्यास सुरूवात केली! हे इतक्या लवकर कसे घडले? पेत्र आणि त्याच्या सहकाऱ्यांनी काय केले ते पाहू म्हणजे आपल्यालाही तसेच करता येईल.
- पेंटेकॉस्टपूर्वी सात आठवडे अगोदर येशू मरणातून उठला चाळीस दिवसात त्याने अनेक वेळा आपल्या शिष्यांना दर्शन दिले, आणि त्यांना अखेरच्या सूचना दिल्या पेंटेकॉस्टपूर्वी दहा दिवस त्यांनी येशूला स्वर्गात वर जाताना पाहिले.
- येशूने अनेक गोष्टी (आज्ञा) करायला सांगितल्या त्याच्या ह्या आज्ञांचे सात "मुळ" आज्ञांच्या नावाने वार्गिकरण करता येईल आरंभीच्या 3,000 नव्या विश्वासणाऱ्यांनी प्रे. कृ. अध्याय 2 मध्ये ह्या आज्ञांचे तत्काळ पालन करण्यास सुरूवात केली. प्रीती ह्या एकाच आज्ञेचा नावाने उल्लेख केलेला नाही ही प्रीती त्यांची सहभागिता आणि एकमेकांशी वाटून घेण्यात यातून त्यांनी दाखवली.
- पेत्राप्रमाणे शिष्य करणारे चांगले सेवक येशूच्या सर्व आज्ञांचे पालन करण्यास शिकवतात संपूर्ण आज्ञापालन मंडळीला, न तुटणाऱ्या साखळी प्रमाणे, मजबूत करते.

- पुढे सात आज्ञा दिल्या आहेत तुमच्या मंडळीने कोणत्या आज्ञेचे आधिक चांगले पालन करण्याची आवयकता आहे त्या समोर खूण करा:




1. **पश्चात्ताप करा, विश्वास ठेवा आणि पवित्र आत्मा मिळवा**
   पालट होणे, नवा जन्म होणे, मार्क 1:15; योहान 3:16; योहान 20:22
2. **बाप्तिस्मा घ्या.**
   बाप्तिस्म्या व्दारे नव्या पालट झालेल्या जीवनाची सुरूवात व्हावी मिळवी प्रे. कृ. 2:38; मत्तय 28:18-20
3. **प्रीती**
   देव, शेजारी, विश्वासणारे, गरजू आणि शत्रू (त्यांना क्षमा करा) ह्यांच्यावर प्रेम करा, मत्तय 22:36-40; योहान 13:34-35; लूक 10:25-37; मत्तय 5:43-49.
4. **भाकरी मोडा**
   प्रभुभोजन हे आम्ही उपासना करीत असलेल्या सर्व गोष्टीशी निगडीत आहे, मत्तय 26:26-28; योहान 4:24
5. **प्रार्थना**
   येशूच्या नावाने वैयक्तिक आणि कौटुंबिक भक्तीत प्रार्थना करा, मध्यस्थीची प्रार्थना करा आणि आध्यात्मिक युद्ध करा, योहान 16:24
6. **दान द्या**
   आपली संपत्ती वेळ बुद्धिकौशल्य ह्यांचे कारभारीपण करा लूक 6:38; मत्तय 6:1-4.
7. **शिष्य करा** (ख्रिस्तासाठी साक्ष द्या, त्याच्या मंडळीची देखभाल करा, वचन आचरणात आणा, पुढाऱ्यांना प्रशिक्षण द्या, मिशनरी सेवक पाठवा), मत्तय 28:18-20

**पाठ करा** येशूने सोपवलेली महान कामगिरी मत्तय 28:18-20 तसेच त्यात पुढील गोष्टी पाहा:

- येशूने आपल्या शिष्यांना कोणत्या अधिकाराने शिष्य करण्याची आज्ञा केली?
- पुनरूत्थीत विजयी ख्रिस्ताने आम्हांला स्वर्गातील व पृथ्वीवरील संपूर्ण अधिकाराने आज्ञा दिली आहे. हा अधिकार कोणताही राजा, अध्यक्ष किंवा सैन्याच्या अधिकारापेक्षा मोठा आहे. कोणाकडे जाऊन आम्हांला शिष्य करण्याची आज्ञा केली?
- बाप्तिस्मा देण्या व्यतिरिक्त सर्व लोकांना शिष्य करा हे त्याने कसे सांगितले?
- येशूने असे कोणते समाधानकारक अभिवचन दिले की त्यामुळे त्याच्या सर्व आज्ञांचे पालन करण्यास शिष्यांना सांगण्याचे मोठे काम सोपे झाले?
- पाहा प्रे कृ. 1:14 मध्ये देवाने पेंटेकॉस्टच्या दिवशी आपल्या महान कार्याला आरंभ केला तेव्हा येशूचे शिष्य काय करीत होते.
- पाहा प्रे. कृ. 2:1-24 मध्ये पवित्र आत्म्याने प्रेषितांना काय करण्याचे सामर्थ्य दिले त्यामुळे पेत्राचे भाषण ऐकणाऱ्या यहूदी लोकांची खात्री पटली.

**2. आठवडयातील कार्यक्रमांचे सहकाऱ्यांबरोबर नियोजन करा.**

- मंडळीच्या लक्षात राहावे यासाठी एखाद्या सर्जनशील व्यक्तीला येशूच्या मुख्य आज्ञा विषयी गीत लिहिण्यास सांगा.

- येशूच्या सर्व मुख्य आज्ञांचे अद्याप पालन न करणाऱ्या विश्वासणाऱ्यांची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन करा.
- ह्या आज्ञा म्हणजे आधाराचा पाया असून त्यावर आपण सर्व सेवाकार्यांची उभारणी करतो हे त्यांना स्पष्ट करून सांगा.
- विश्वासणारे रात्रंदिवस ओठांनी देवाची स्तुती करीत असतील जर ते प्रेमाने येशूच्या आज्ञांचे पालन करीत नसतील तर देव त्यांची स्तुती मान्य करून घेणार नाही, मत्तय 14:1-8

**3. आगामी उपासना सभेची सहकाऱ्यांबरोबर योजना**

विशेष प्रसंग आणि स्थानिक रिवाजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडून ते योजनाबद्ध रितीने सादर करा.

शिष्य करणाऱ्या आरंभीच्या मंडळीचा कथावृत्तांत्त सांगा. तसेच शिष्य करणाऱ्या पेत्र आणि इतरांनी अनेक नविन विश्वासणाऱ्यांना अगदी आरंभापासूनच येशूच्या आज्ञाचे पालन करायला कसे शिकवले तेही सांगा.

- मत्तय 28:18-20 मध्ये येशूने केलेल्या अंतिम मार्गदर्शनाचे महत्त्व स्पष्ट करून सांगा.
- येशूच्या सात मुख्य आज्ञा (वर दिलेल्या) पाठ करण्यास विश्वासणाऱ्यांना मदत करा.
- ह्या आज्ञा म्हणजे आमचे सर्व शिक्षण व सेवाकार्याचा आधारभूत पाया आहे, हे स्पष्ट करून सांगा.
- खडकावर घर बांधणाऱ्या शहाण्या माणसाचा येशूने दृष्टांत सांगितला त्याचे मुलांना नाट्यीकरण करण्यास सांगा.
- शहाण्या माणसाने येशूचे म्हणणे ऐकले अणि आज्ञापालन अशा दोन्ही गोष्टी केल्या हे स्पष्ट करा.
- मुलांना त्यांनी तयार केलेले प्रश्न विचारण्यास सांगा.

येशूने सांगितल्यानुसार शिष्य करण्यासाठी पवित्र आत्म्याने तुमचे साहाय्य करावे यासाठी विनंती करा.

प्रभु भोजनाची ओळख करून देण्यासाठी प्रे.कृ. 2:46 वाचा ही ख्रिस्ताची मुख्य आज्ञा आहे. आरंभीच्या विश्वाणाऱ्यानी आपआपल्या घरांमध्ये भाकरी मोडून येशूचे आज्ञापालन केले.

येशूच्या आज्ञाचे पालन करण्यास विश्वासणाऱ्यांना सेवकांनी नुकतेच शिक्षण दिले असल्यास त्यांचे अहवाल विचारा.

आठवडयामध्ये तुम्ही योजलेल्या कार्यक्रमांची घोषणा व व्यवस्था करा.

दोन वा तीन जणांचे गट करा. एकमेकांसाठी प्रार्थना करा उत्तेजन द्या आणि योजनांना अंतिम स्वरूप द्या.

**पाठ करा:** योहान 14:15 "माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल."

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net